
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. 9236



# कांहींतरी नवेंच करा!

# लोकहिताचा संरक्षक

# लो क हि ता चा सं र क्ष क

*


वि. उ. वैद्य

कांहीं तरी नवेंच करा : ४८

१२३५ दि. २०।५।८१
बा.वा.

पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.



१९२५ सालीं विठ्ठलभाई पटेल अखिल भारतीय विधिमंडळाचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्या जागेवर बसून 'जनपदहितकर्ता' किंवा लोकहिताचा संरक्षक या नात्यानें कर्तव्य बजावणें केवढें अवघड होतें हें त्या काळच्या त्या विधिमंडळाच्या कामकाजाचा इतिहास वाचून समजेल. तो खरोखरीच कांटेरी मुकुट होता; आणि विठ्ठलभाईंनीं तो मोठ्या कौशल्यानें पण तेजस्वितेनें सांभाळला. लोकसभेंत, विधिमंडळांत, नगरपालिकेंत किंवा लोकल बोर्ड, ग्रामपंचायतीसारख्या लोकप्रतिनिधिक संस्थांतून निवडल्या जाणाऱ्या प्रत्येक सभासदाचें लोकहिताचें संरक्षण हेंच प्रथम व अपरिहार्य कर्तव्य असतें. आजच्या लोकशाहीच्या काळांत तर या कर्तव्याच्या जाणिवेची गरज फारच तीव्रतेनें भासते.—आमदार, खासदार किंवा यासारख्या कोणत्याहि पदाची अपेक्षा बाळगणाऱ्या नवतरुणांनीं पटेलांचा आदर्श अवश्य आपल्यासमोर ठेवण्यासारखा आहे.

श्री : २०८:२[२-६४]

© १९६०
वो रा ॲ ण्ड कं प नी
प ब्लि श र्स प्रा. लि.

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वो रा ॲ ण्ड कं प नी
पब्लि. प्रा.लि.करितां
३, रा उं ड बि ल्डिं ग
काळबादेवी, मुंबई २.

*

आवृत्ति दुसरी
१९६४

*

किंमत ५० नये पैसे

*

मुद्रक :
ज. ग. जोशी
ज ना र्द न प्रे स,
३९४ सदाशिव पेठ,
पुणें २

ग्र ... ... ... ग्र शाखा.
१२३६ दि. २०।५।८७
क्र. ....
शि. बा. वा. ....

# लोकहिताचा संरक्षक : नामदार विठ्ठलभाई पटेल

आपला भारत १९४७ सालीं स्वतंत्र झाला. तो स्वतंत्र व्हावा म्हणून अनेक देशभक्तांनीं अनेक तऱ्हेचे प्रयत्न केले. त्या देशभक्तांत पटेलबंधू हे अग्रेसर होते. जसे सावरकर-बंधू देशाच्या इतिहासांत अमरत्व पावले तसे हे पटेल-बंधूहि चिरंजीव ठरले. पटेलबंधू म्हणजे विठ्ठलभाई पटेल व वल्लभभाई पटेल. दोघेहि बॅरिस्टर, त्यागी, निर्भय, उद्योगी व कळकळीचे थोर देशभक्त होते. या पटेलबंधूंपैकीं विठ्ठलभाई पटेल यांचा आपणांस अधिक परिचय करून घ्यावयाचा आहे. विठ्ठलभाईंना आपल्या देशांत देशबंधु दास, लाला लजपतराय, पितापुत्र नेहरू, पं. मालवीय, म. गांधी व लो. टिळक यांच्या बरोबरीनें मान दिला जातो. उज्ज्वल कार्यनिष्ठा, निःस्वार्थी वृत्ति, अविरत श्रम, देशहिताची अखंड तळमळ व महान् त्याग या गुणांना मोहून तर म. गांधींनीं विठ्ठलभाईंना 'फकीर' असें म्हटलें आहे. अशा या फकिराचा किंवा भारताच्या स्वातंत्र्या-साठीं लढलेल्या या खंद्या वीराचा जीवनपट किती तेजस्वी आहे तो पाहा.

## शेतकऱ्याचें पोर

पटेल घराणें गुजराथेंतील करमसद या गांवचें. त्यांची ज्ञाति म्हणजे (लेवा) पाटीदार. ही ज्ञाति मुळांतच मोठी बुद्धिमान्, मेहनती व धडाडीची असल्यामुळें गुजराथला व पर्यायानें देशाला या जातींतून अनेक थोर देशभक्तांचा व कार्यकर्त्यांचा लाभ झाला आहे. विठ्ठलभाई हे एका शेतकरी कुटुंबांतील. त्यांच्या वडिलांचें नांव जव्हेरभाई व आईचें नांव लाडबाई असें होतें. शेतकऱ्याच्या मुलानें हातांत नांगर धरण्याऐवजीं शिक्षण घ्यावें व त्यांत पुन्हां इंग्रजी शिकावें ही गोष्ट त्या काळीं विपरीत मानली जाई! विठ्ठलभाईंनीं ही विपरीत गोष्ट केली. त्यांनीं मोठ्या कष्टानें इंग्रजी शिक्षण घेतलें व स्वसामर्थ्यावर विलायतेस जाऊन ते बॅरिस्टर झाले आणि त्याग, धडाडी, देशभक्ति व विद्वत्ता यांच्या जोरावर हें शेतकऱ्याचें पोर भारतीय विधिमंडळाच्या अध्यक्षपदीं, पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून विराजमान झालें व आपल्या कणखर नि राष्ट्रीय बाण्यानें पंचखंडांत कीर्तिमान् ठरलें!

## अतिशय हूड पण तितकेच हुशार

विठ्ठलभाई पांचव्या वर्षींच करमसदच्या गांवठी शाळेंत जाऊं लागले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना इंग्रजी शिक्षणासाठीं मामाकडे नडियादला ठेवलें. पहिल्यापासूनच विठ्ठलभाई मोठ्या चौकस बुद्धीचे व अतिशय हूड! विठ्ठलभाई अतिशय हूड तर होतेच पण तसेच ते मोठे हुषारहि होते. त्यांची स्मरणशक्ति तर जबरदस्तच होती.

## निर्भयता व राष्ट्राभिमान

राष्ट्रीय अभिमान व निर्भयता हे गुण विठ्ठलभाईंच्या ठिकाणी लहानपणापासून आणि फार मोठ्या प्रमाणांत दिसून येतात. मॅट्रिकच्या अगोदर होणाऱ्या पूर्वपरीक्षेच्या वेळची गोष्ट. त्या परीक्षेंत 'इंग्रज सरकारमुळें आपले कोणते फायदे झाले ?' असा निबंध विचारला होता. विठ्ठलभाईंनीं आपल्या निबंधांत इंग्रजी राज्यापासून झालेले तोटे लिहिले. परीक्षकांनीं त्यांना नापास केलें ! विठ्ठलभाईंना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. पुढील वर्षी ते केंद्र बदलून बसले व परीक्षेंत चांगल्या तऱ्हेनें उत्तीर्ण झाले. विठ्ठलभाईंची आपल्या आईबापांवरील भक्ति अशीच विलक्षण होती. शिक्षणासाठीं त्यांना नडियादला, अहमदाबादला व पुढें मुंबईला राहावें लागलें. पण दर महिन्याला आपल्या गांवीं येऊन आईबापांना भेटल्याशिवाय ते कधीं राहिले नाहींत, कारण त्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे !

## वकिलीची परीक्षा

मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठीं त्यांनीं बडोद्यास राहावयाचें ठरविलें. पण लवकरच तेथील 'कॉलेज' शिक्षण सोडून ते मुंबईस वकिलीचा अभ्यास करण्यासाठीं गेले. तेथं वर्गांत गप्प बसून नुसते ऐकणारे असे ते विद्यार्थी नव्हते. वर्गांत निरनिराळे प्रश्न विचारून व त्यावर चर्चा करून ते आपल्या ज्ञानांत भर घालीत. मनःपूर्वक व उत्कृष्ट अभ्यास करून १८९५ मध्यें ते

'डिस्ट्रिक्ट प्लीडर'च्या म्हणजे वकिलीच्या परीक्षेंत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले. पुढें प्रथम गोध्र्यास व नंतर बोरसद या गांवीं त्यांनीं वकिलीस सुरुवात केली. लवकरच या धंद्यांत त्यांना चांगलें यश मिळालें व फौजदारी खटल्यांत ते फार तरबेज ठरले.

## पहिल्यापासून सामाजिक कार्याकडे लक्ष

पटेल हे पाटीदार जातीचे. त्या जातीमध्यें एखादा मनुष्य मृत झाल्यास त्याच्या स्मरणार्थ आवाक्याबाहेर, प्रसंगीं कर्ज काढूनहि, खर्च करण्याची पद्धत होती. पटेलांचा या गोष्टीस फार विरोध होता. त्यांचे वडील जेव्हां वारले तेव्हां त्यांच्या घरांतच हा प्रश्न उपस्थित झाला. विठ्ठलभाईंनीं अधिक खर्च न करण्याबद्दल वडिलधाऱ्या माणसांची खूप मनधरणी केली. आपलें कोणी ऐकत नाहीं असें दिसतांच ते घर सोडून बाहेर पडले. पण शेवटीं करावयाच्या खर्चाइतकी रक्कम शिक्षणसंस्थेस देणगी म्हणून द्यावी व अनिष्ट रूढीपायीं खर्च करूं नये असें पटेलांनीं सुचविलें व त्याप्रमाणें त्यांनीं तें लगेच अमलांतहि आणलें. पटेलांचें हें उदाहरण अनेकांनीं गिरविलें व आपापले खर्च कमी केले आणि जे खर्च केले ते सत्कारणीं केले. लवकरच अखिल पाटीदार परिषद अहमदाबाद येथें भरली. तिचें अध्यक्षपद विठ्ठलभाईंना देण्यांत आलें. त्यांनीं अध्यक्षीय भाषणांत आपल्या जातींतील अनिष्ट रूढींवर कडाडून हल्ला चढविला. यावरून राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्राकडेहि त्यांचें प्रमुखपणें लक्ष होतें असें दिसतें.

## बॅरिस्टर पटेल

वल्लभभाई विठ्ठलभाईंचे धाकटे बंधु. तेहि नांवाजलेले वकील होते. त्यांना विलायतेस जाऊन आपण बॅरिस्टर होऊन यावें असें फार वाटे. त्यांनीं त्याप्रमाणें स्वतःच्या कमाईंतून आवश्यक ती रक्कम जमविली व योग्य तो पत्रव्यवहार करून 'पासपोर्ट' म्हणजे प्रवासाचा परवानाहि मिळविला. पण तो परवाना पोस्टानें आला व नेमका विठ्ठलभाईंच्या हातांत पडला. परवान्यांत 'व्ही. जे. पटेल' हीं अक्षरें पाहून हा परवाना आपल्याला चालेल हें विठ्ठलभाईंच्या लक्षांत आलें व ते वल्लभभाईंना म्हणाले, "मला हा परवाना घेऊन विलायतेस जाऊन येऊं दे. तूं नंतर जा". वल्लभभाईंनीं तें मान्य केलें व हे थोरले बंधुराज विलायतेस जावयास निघाले. निघण्यापूर्वीं मुंबईहून आईला व पत्नीला तारेनें कळविलें कीं, "मी बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेस जात आहें." दोघींना वाईट वाटलें पण विठ्ठलभाई चांगल्या कामासाठीं जात आहेत यामध्यें दोघींनींहि त्यांतल्या त्यांत समाधान मानून घेतलें. एरवीं मागूनहि रीतसर परवानगी मिळाली नसती म्हणून विठ्ठलभाईंनीं अशी युक्ति केली.

१९०५ सालीं विठ्ठलभाई इंग्लंडला गेले. बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठीं त्यांनीं 'लिकन्स इन' मध्यें नांव दाखल केलें. चैन व ऐषाराम हें त्यांचें ध्येय नव्हतें. स्वकष्टार्जित पैशावर त्यांना अभ्यासक्रम पुरा करावयाचा असल्यामुळें साधे कपडे, साधें राहणें व साधें खाणें, पण अभ्यास मात्र

भरपूर करणें यावर त्यांचा कटाक्ष असे. बॅरिस्टरीच्या परीक्षेची तयारी म्हणजे थोडेंसें वाचन नि भोजन-समारंभाना हजर राहणें इतकीच असे. पण विठ्ठलभाईंनीं अभ्यासास प्राधान्य दिलें व तीन वर्षांचा अभ्यास अडीच वर्षांत पुरा केला नि परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला क्रमांक पटकावून शिवाय वर पन्नास पौंडांचें बक्षीसहि मिळविलें. इंग्लंडमध्यें असतांना त्यांनीं कायद्याच्या अभ्यासाबरोबरच जगांतील प्रमुख देशांच्या राज्यघटनांचा व राज्यपद्धतींचाहि अभ्यास केला. विलायतेहून परत येतांना त्यांच्या प्राध्यापकांनीं दिलेल्या शिफारसपत्रांत पुढीलप्रमाणें गुणगौरव केलेला आहे : “ पटेल हे व्याख्यानांना नियमित हजर राहात असत. त्यांची वर्तणूक नेहमीं उत्तम होती. हायकोर्टांत बॅरिस्टरी चालविण्यास किंवा कायद्याचे प्राध्यापक होण्यास ते सर्वस्वीं लायक आहेत. ते आपलीं कामें तत्परतेनें, हुषारीनें व चोखपणें बजावितील. ”

बॅरिस्टर पटेल हे १९०८ मध्यें मायदेशास परत आले. यापुढें धंद्याच्या दृष्टीनें बोरसदला राहणें योग्य नव्हतें. म्हणून त्यांनीं मुंबईस स्थायिक होऊन हायकोर्टांत वकिली करण्याचें ठरविलें. बोरसद सोडतांना त्या गांवावरील प्रेमाचें निदर्शक म्हणून त्यांनीं तेथील हायस्कूलला एक सहस्र रुपयांची देणगी दिली. मुंबईस बॅरिस्टरीचा व्यवसाय करीत असतांना पैशापेक्षां सचोटीकडे त्यांचें अधिक लक्ष असे व स्वतः शिस्तपालन करून इतर संबंधितांना ते कडक रीतीनें शिस्त पाळावयास लावीत असत.

## कौटुंबिक आपत्ति

विठ्ठलभाई मुंबईस आल्यानंतर मलेरियानें कित्येक महिने आजारी होते. प्रकृतीला आराम वाटावा म्हणून ते मुंबई सोडून बोरसदला गेले. तेथें कांहीं कालानंतर त्यांची प्रकृति सुधारली. पण एक मोठीच आपत्ति त्यांच्यावर कोसळली. त्यांची पत्नी आजारी पडली व शस्त्रक्रियेनंतर मृत्यु पावली ! विठ्ठलभाईंना एक छोटीशी मुलगी होती पण तीहि बिचारी आईपाठोपाठ देवाघरीं निघून गेली ! विठ्ठलभाईंनीं पुनः लग्न केलें नाहीं – देशासाठीं ते फकीर बनले !

## देशसेवेचा ओनामा

पटेलांचा शेतकरी बांधवांशीं व ग्रामीण जनतेशीं वारंवार संबंध आल्यामुळें त्यांचीं दुःखें त्यांना माहीत होतीं. त्या दुःखांशीं समरस व्हावें व तीं निवारण्याचा आपल्या सामर्थ्याप्रमाणें प्रयत्न करावा असें त्यांनीं व्रत घेतलें व आपल्या सार्वजनिक जीवनाला मोठ्या उमेदीनें व तडफेनें सुरुवात केली. संसाराची म्हणजे कुटुंबियांची जबाबदारी धाकट्या भावावर टाकून विठ्ठलभाईंनीं देशाची वकिली करण्याचें खडतर व्रत स्वीकारलें. त्यांचें असें मत होतें कीं, देशसेवा करणाऱ्यांनीं राज्यकारभारांतील निवडून दिलेल्या जागा ताब्यांत घेतल्या पाहिजेत तरच जनतेचें थोडें फार भलें करतां येईल. या त्यांच्या तत्त्वाप्रमाणें त्यांनीं बोरसद तालुका बोर्डाचे सभासद म्हणून निवडून

येऊन आपल्या देशसेवेचा प्रारंभ केला. हा त्यांच्या देशसेवेच्या जीवनगंगेचा उगम होय. पुढें अल्पसा प्रवाह किती अफाट, उपकारक नि पवित्र बनला हेंच आपल्याला क्रमशः पाहावयाचें आहे.

१९११ मध्यें विठ्ठलभाई तालुका बोर्डाचे सभासद झाले नि त्याच वर्षाच्या शेवटीं ते खेडा जिल्ह्याच्या बोर्डावर बिनविरोध निवडले गेले. १९१२ मध्यें उत्तर भागांतील जिल्हा बोर्डातर्फे मुंबई कौन्सिलवर सभासद निवडून देण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां विठ्ठलभाई हेच ४० विरुद्ध २८ मतांनीं विजयी झाले.

## कौन्सिलर पटेल

१९१२ मधील कौन्सिल म्हणजे राजनिष्ठांचा जी-हुजुरांचा मेळावा. त्या मेळाव्यांत लोकहिताचे प्रश्न विचारणारे, ठराव मांडणारे किंवा सरकारवर सौम्यहि टीका करणारे सभासद शोधूनहि सांपडणारे नव्हते. अशा कौन्सिलमध्यें पटेलांना लोकहिताचे संरक्षक म्हणून काम करावयाचें होतें. तें त्यांनीं अत्यंत अभ्यासूपणें, चिकाटीनें व निर्भयपणें केलें नि खुद्द गव्हर्नर अध्यक्ष असलेल्या कौन्सिलमध्यें दरारा उत्पन्न केला !

पण यासाठीं पटेलांनीं तयारी कशी केली ती पाहा. त्यांनीं १८९२ पासूनचीं कौन्सिलच्या कामकाजाचीं पुस्तकें मोठ्या काळजीपूर्वक अभ्यासिलीं. बोलण्यापूर्वीं त्या त्या विषयाची सांगोपांग माहिती ते मिळवीत. त्यांची तयारी पाहून त्यांचे सहकारी रँ. परांजपे, श्री. कामत हे

तर चकितच होत. सबंध कौन्सिलमध्यें पटेलांच्याइतका तयारी असलेला दुसरा सभासद नव्हता. त्यांच्याइतके ठराव कोणींहि मांडले नाहींत वा प्रश्नहि कोणीं विचारले नाहींत. भरीव ज्ञान, बारीकसारीक माहिती, तर्कशुद्ध विचारसरणी, बेडरवृत्ति व विलक्षण हजरजबाबीपणा यांमुळें सरकारशीं त्यांची नेहमींच खडाजंगी उडे !

बिनसरकारी कामकाजासाठीं दिलेला वेळ जवळ जवळ सर्वच्या सर्व पटेलच घ्यावयाचे. त्यामुळें अध्यक्ष लॉर्ड विलिंग्डन खूप चिडावयाचे व पटेलांच्या भाषणांत एक-सारखे अडथळे आणावयाचे ! पण पटेल यामुळें कधींच माघार घेत नसत. त्यांनीं सरकारी अडथळ्यांना न जुमा-नतां प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याविषयींचा ठराव व देशी वैद्यकाचा ठराव हे पुढें आणले व सरकारी पक्षाची मोठी त्रेधा उडवून दिली ! प्राथमिक शिक्षणाच्या-बाबत सरकारनें स्वतःची जबाबदारी नगरपालिकांवर टाकिली व त्यांनीं इच्छा असल्यास व खर्चाच्या दृष्टीनें झेपत असल्यास प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करावें असें परस्पर टोलविलें ! या अल्प सवलतीचा फायदा पुढें पटेलांनीं घेतला. मुंबई महापालिकेच्या स्कूल्स कमिटीचे अध्यक्ष असतांना त्यांनीं दोन वॉर्डांमध्यें प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करून टाकलें.

देशी वैद्यकाबाबतचा ठराव पटेलांनीं कौन्सिलांत मांडला याचें कारण त्यांना विलायती वैद्यकाबरोबरचा मान आयुर्वेदाला मिळवून द्यावयाचा होता. या ठरावा-वरील पटेलांचें भाषण इतकें परिणामकारक झालें कीं तो

ठराव आतां संमत केला जाईल अशी भीति सरकार पक्षाला वाटली. पण ही मानहानि टाळण्यासाठीं अध्यक्ष लॉर्ड विलिंग्डन यांनीं ऐन वेळीं दोन डॉक्टरांची सभासद म्हणून नेमणूक केली व तो ठराव हाणून पाडला ! यानंतर गमतीचा, पण पटेलांचें विशिष्ट स्वभावदर्शन घडविणारा, पुढील प्रकार घडला. ते दोन जादा डॉक्टर सभासद त्या विशिष्ट ठरावापुरतेच नेमलेले होते तरी ते पुढील कामकाजाच्या वेळीं तसेच बसून राहिले. पटेलांच्या हें लगेच लक्षांत आलें. ते शांतपणें उभे राहिले व अध्यक्षांना म्हणाले, " महाराज, या दोन नव्या गृहस्थांची या सभेला आतां जरुरी नाहीं. त्यांना बाहेर जाण्याविषयीं आपण आज्ञा करावी ! " अध्यक्षांना तें मान्यच करावें लागलें. त्यांनीं त्या सभासदांना सभागृह सोडण्याविषयीं फर्माविलें. ते दोघेहि जाऊं लागले तेव्हां पटेल हंसून व कपाळाला हात लावून म्हणाले, " अच्छा, अच्छा, जाव् ! " तेव्हां सर्व सभागृहांत हंशा पिकला. पण त्या दोघां डॉक्टरांना मात्र मेल्याहून मेल्यासारखें झालें !

## खेडा जिल्ह्यांतील दुष्काळ

पटेल कौन्सिलमध्यें जसे लोकांच्या बाजूनें झगडत तसेच ते बाहेर चळवळींत भाग घेत व लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. १९१७–१८ मध्यें खेडा जिल्ह्यांत मोठा दुष्काळ पडला. लोक अन्नाला मोताद झाले. पण सरकार कांहीं सारासूट देईना व कांहीं दादहि घेईना ! तेव्हां पटेलांनीं इतर पुढाऱ्यांच्या

साहाय्यानें सभा, परिषदा, मुलाखती व कौन्सिलांत ठराव या विविध मार्गांनीं आकाशपाताळ अगदीं एक केलें ! सत्याग्रहापर्यंत पाळी आली. पण शेवटीं व्हाइसरॉयच्या हस्तक्षेपामुळें सक्तीची सारावसुली थांबली व शांतता प्रस्थापित झाली. या चळवळीच्या वेळीं पटेलांच्या कार्यशक्ति, विद्वत्ता व निर्मळ देशप्रीति या गुणांची जनतेला पूर्ण ओळख झाली.

## विशाल कार्यक्षेत्रांत पदार्पण

कौन्सिलमधील व कौन्सिलबाहेरील तेजस्वी कामगिरीमुळें पटेलांची कीर्ति सर्वत्र पसरूं लागली. त्यांना सभा-परिषदांचीं आमंत्रणें येऊं लागलीं. त्यांच्या अध्यक्षतेखालीं महत्त्वाच्या परिषदा भरूं लागल्या. १९१८ मध्यें विजापूरला भरलेली राजकीय परिषद विशेष महत्त्वाची होती. त्या परिषदेला महात्मा गांधी, सेनापति बापट व देशभक्त तात्यासाहेब केळकर उपस्थित होते. त्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना पटेलांनीं लोकांची बाजू खणखणीतपणें सरकारपुढें मांडली. ते म्हणाले, "सरकार हिंदी लोकांना युद्धांत सहभागी होण्याविषयीं सांगत आहे. पण निःशस्त्र व निर्बळ हिंदी लोक काय करणार ? आमच्या तरुणांना लष्करी शिक्षण द्या असें सांगूनहि सरकारनें तिकडे दुर्लक्ष केलें. आतां ऐन वेळीं आम्ही हिंदी लोक मोठ्या संख्येनें येऊं, लष्करांत भरती होऊं पण आमच्या सैनिकांना युरोपियन सैनिकांप्रमाणें वागविलें पाहिजे. आमच्या सैनिकांचा पोशाख, त्यांची व्यवस्था व

त्यांचे हक्क युरोपियन सैनिकांप्रमाणें हवेत. कोणत्याहि तऱ्हेची विषमता न ठेवतां सरकारनें आमच्या सैनिकांना लष्कर, आरमार व विमानदल यांमध्यें वाढता प्रवेश दिला पाहिजे."

१९१८ मध्यें मॉन्टफर्ड सुधारणा सरकारनें जाहीर केल्या. त्या सुधारणांबाबत लोकमत व्यक्त करण्याकरितां मुंबईस व दिल्लीस काँग्रेसचीं जादा अधिवेशनें भरलीं होतीं. सरकारनें देऊं केलेल्या सुधारणा असमाधानकारक व निराशाजनक आहेत; व हिंदुस्थान स्वराज्याला आजहि लायक आहे असें काँग्रेसनें घोषित केलें. काँग्रेसचें म्हणणें विलायत सरकारपुढें मांडण्यासाठीं व सुधारणांत भारताला अनुकूल असा बदल घडवून आणण्यासाठीं एक शिष्टमंडळ विलायतेस पाठविण्याचें ठरलें. पटेलांना त्या शिष्टमंडळाचे चिटणीस व काँग्रेसचेहि जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

## विलायतेस प्रयाण

२९ एप्रिल १९१९ ला पटेल व केळकर विलायतेस जाण्यास निघाले. तेथें पार्लमेंटनें नेमलेल्या सुधारणा कमिटीपुढें हिंदुस्थानच्या वतीनें साक्षी देणें, भारतमंत्री व इतर मंत्री यांच्या भेटी घेणें व ब्रिटिश जनतेचें मत अनुकूल करून घेणें अशी तिहेरी कामगिरी शिष्टमंडळाला करावयाची होती.

पटेलांची साक्ष ९ ऑगस्टला झाली. ती तब्बल तीन तास चालली. त्या प्रसंगीं त्यांनीं काँग्रेसची बाजू ठासून

मांडली. कोणाच्याहि निंदास्तुतीची पर्वा न बाळगतां त्यांनीं आपलें कर्तव्य बजावलें. मजूरपक्षाचे पुढारी बेनस्पुर लिहितात: "काँग्रेस शिष्टमंडळानें केलेली पटेलांची निवड सर्वथैव योग्य होती. त्यांच्या बोलण्यांत मवाळपणा किंवा शरणागति नव्हती." पटेलांनीं जेव्हां काँग्रेसच्या सरचिटणिसाची जागा सोडली तेव्हां काँग्रेसनें पुढीलप्रमाणें ठराव केला: "आग्रचे सरचिटणीस श्री. व्ही. जे. पटेल यांनीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत जी स्वदेशाची बहुमोल कामगिरी केली त्याबद्दल ही राष्ट्रीय सभा त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानते." हा ठराव मांडतांना जेव्हां पटेलांच्या नांवाचा उच्चार झाला तेव्हां जमलेल्या अफाट समुदायानें टाळ्यांचा प्रचंड गजर करून पटेलांबद्दल आपला आदर व्यक्त केला.

## म. गांधींशीं कांहीं मतभेद पण राष्ट्रासाठीं एकोपा

स्वकीयांशीं वागतांना पटेल निर्भीडपणें व प्रामाणिक मतभेद राखून वागत असत. गांधीजींच्या कांहीं गोष्टी त्यांना पसंत नसत. परदेशी कापडावरील बहिष्कार पटेलांना मान्य होता. पण हातानें चरख्यावर सूत कातणें व खादी तयार करणें या गोष्टीला त्यांचा विरोध होता. खादी हें राजकीय उन्नतीचें साधन आहे, आर्थिक उन्नतीचें नव्हे असें ते म्हणत. चालू यंत्रयुगांत गांधीजींचें हातसुताचें व खादीचें तत्त्वज्ञान हिंदुस्थानला फायद्याचें नाहीं असें त्यांना वाटे. पुढे कांग्रेसमध्यें फेरवाले व नाफेरवाले असेहि पक्ष पडले व इतरहि मतभेद निर्माण झाले, पण पटेल निर्मळ

नि सच्चे देशभक्त असल्यामुळें त्यांनीं मतभेदामुळें देशसेवेंत थोडाहि खंड पडूं दिला नाहीं. पंजाब प्रकरण, कायदेभंगाची चळवळ व नागपूरचा झेंडासत्याग्रह या सर्व प्रसंगीं त्यांनीं शब्दश: जिवाचें रान केलें व आपल्या निर्भय देशसेवेचें व्रत चालू ठेवलें.

## मुंबई महापालिकेचे कर्तबगार सभासद

आपल्या मतदारसंघांतून स्थानिक स्वराज्य संस्थांत निवडून जाऊन जनतेची किती अपूर्व व तेजस्वी सेवा करतां येते याचें पटेल म्हणजे एक नमुनेदार व अद्भुत उदाहरण आहे. मुंबईची महापालिका म्हणजे एक बडें संस्थान होतें. सरकारी अधिकारी व बडे भांडवलदार यांच्या हातांतील ती एक निर्जीव खेळणें होती. सारा कारभार राष्ट्रीय दृष्टया स्वाभिमानशून्यतेचा ! सारांश, ती कांहीं लोकांची संस्था व लोकांच्या हिताकरितां चालविलेली संस्था नव्हती !

पण पटेलांनीं सभासद झाल्यानंतर व पुढें अध्यक्षस्थानीं वैभवानें विराजमान झाल्यानंतर मुंबई महापालिकेचें स्वरूप आमूलाग्र बदलून टाकलें व तिला राष्ट्रीय स्वाभिमानाची जळती नि तेजस्वी ज्योत बनविलें. महापालिकेंतील पटेलांची कारकीर्द म्हणजे पारतंत्र्याच्या काळोखांतील तेजस्वी विजेचा लखलखाटच होय !

नगरपालिका म्हणजे लोकांची संस्था. निवडून आलेला सभासद हा जनतेचा विश्वासू सेवक. पटेलांची ही श्रद्धा असल्यामुळें सभासद झाल्याबरोबर त्यांनीं महापालिकेच्या

सर्व बाबींकडे जातीनें लक्ष दिलें. १९२३ मध्यें त्यांनीं म्युनिसिपल नॅशनलिस्ट पक्ष स्थापन केला व त्या पक्षातर्फे निवडणुका लढवून एकंदर ४८ जागा काबीज केल्या. निवडणुकींत यश मिळविण्यासाठीं पटेलांनीं एकट्यांनीं २५० सभा घेऊन राष्ट्रीय कार्यक्रमाचा जोरदार प्रचार केला. ४८ सभासदांच्या या राष्ट्रीय गटाच्या पाठिंब्यावर पटेलांनीं पहिली कामगिरी जर कोणती केली असेल तर ती ही कीं त्यांनीं अध्यक्षपदाबाबतची जातीय रूढी मोडून टाकली. या वर्षीं हिंदु तर पुढल्या वर्षीं पारसी इत्यादि तऱ्हेनें हें पद जातवारीवर दिलें जाई. पटेलांचें म्हणणें असें कीं, हें गुणावर दिलें जावें मग जात कोणती का असेना. या तत्त्वाला विरोधी गट कांहीं मान्यता देईना. तरी पण पटेलांनीं पारश्याचा क्रम असतांनाहि स्वतः निवडणूक लढविली. त्या वेळीं श्री. मोदी यांना ५० मतें व पटेलांना ४७ मतें पडलीं जयापजयाच्या पलीकडे गेलेल्या पटेलांनीं आपली सेवेची कामगिरी तशीच जोरानें चालू ठेविली.

पटेल हे अठ्ठेचाळीस राष्ट्रीय सभासदांच्या गटाचे पुढारी व परखड नि मोठे निर्भीड. तेव्हां महापालिकेमध्यें नवचैतन्य निर्माण करण्यासाठीं त्यांनीं अनेक राष्ट्रीय घटना घडवून आणल्या. लोकांची बाजू घेऊन त्यासाठीं लढा देणें हा तर पटेलांचा मुख्य बाणा. आणि तोच त्यांनीं अव्याहत राखला. एकदां काय झालें कीं, मोदी होते अध्यक्षस्थानीं व महापालिकेच्या सभागृहांत लोकांनीं खूप गर्दी केली. लोकांना एका महत्त्वाच्या ठरावावरील चर्चा ऐकावयाची होती. त्यांनीं प्रेक्षकांच्या गॅलऱ्या भरून

टाकल्या व शेवटीं सभागृहाच्या कांहीं भागांत प्रवेश केला. मोदींना हें आवडलें नाहीं. त्यांनीं लोकांनीं सभागृहांतून निघून जावें अशी आज्ञा दिली. पटेलांनीं आग्रहपूर्वक सांगितलें कीं, "अध्यक्षांनीं लोकांना बाहेर घालवूं नये. महापालिकेचें काम हें जाहीरपणें चालावयाचें असतें व तें पाहण्याचा लोकांचा हक्क आहे. आपण त्यांच्या हक्कां-वर गदा आणूं नका. लोक कोणत्याहि तऱ्हेनें आपल्या कामांत अडथळा आणीत नाहींत." पण अध्यक्ष मोदींना हें म्हणणें पटलें नाहीं. ते म्हणाले, "मीं एकदां आज्ञा दिली ती दिली! लोकांनीं बाहेर गेलें पाहिजे, नाहीं तर त्यांना हाकलून द्यावें लागेल." पटेलांना राग आला. सभेचें वातावरण तंग झालें. पटेलांना एक युक्ति सुचली. राग आवरून ते शांतपणें उभे राहिले व म्हणाले, "आजची ही सभा तहकूब करावी अशी मी सूचना मांडतों." सूचना अर्थातच सभेनें मंजूर केली व त्या दिवशींचा पेंच-प्रसंग टळला! अशा युक्तीनें पटेलांनीं त्या प्रसंगीं लोकांना कांहीं बाहेर काढूं दिलें नाहीं. त्यांनीं लोकांच्या हक्काचा हा असा पाठपुरावा केला!

## शाला समितीचे अध्यक्ष

१४ एप्रिल १९२३ रोजीं शाला समितीचे अध्यक्ष म्हणून ७ विरुद्ध ४ मतांनीं पटेलांची निवड झाली. अध्यक्षस्थान स्वीकारून त्यांनीं जें पहिलें भाषण केलें तें स्वतःच्या मातृभाषेंत. शाला समितींत आतांपावेतों सर्व भाषणें इंग्रजींत होत. पटेलांनीं ती रूढी मोडली—

स्वत: मोडली व असें जाहीर केलें कीं सभासदांनीं कोणत्याहि देशी भाषेंत बोललें तरी चालेल. डॉ. जावळे यांनीं या गोष्टीला विरोध केला असतां पटेल म्हणाले, "इंग्रजींतच बोलावें असा नियम दाखवा. नुसत्या रूढीचें स्तोम माजवूं नका." अर्थात् तसा नियम नसल्यामुळें डॉ. जावळे बिचारे गप्प बसले ! देशी भाषेंत बोलण्या-संबंधीं परवानगी देणारा ठराव त्यांनीं पुढें महापालिकेंतहि मंजूर करून घेतला.

शाला समितीचे अध्यक्ष असतांना पटेलांनीं देशहिताच्या कितीतरी गोष्टी केल्या. दलितांना उत्तेजन देणें, विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट वेगानें वाढविणें, राष्ट्रभाषेच्या शिक्षणाची सोय करणें, दोन विभागांत मोफत व सक्तीचें शिक्षण सुरू करणें, स्वदेशीचा प्रसार करणें, मुलां-साठीं बक्षिसांची रक्कम वाढविणें, शिक्षकांचीं गाऱ्हाणीं दूर करणें व लबाड्या करणारांना शासन करणें इत्यादि गोष्टी त्यांनीं निश्चयानें पार पाडल्या.

## मुंबई महापालिकेचे युगप्रवर्तक अध्यक्ष

१९२४–२५ या वर्षासाठीं पटेलांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. निवडणूक मोठी चुरशीची होऊन पटेलांना ५३ व त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना ४७ मतें पडलीं. या निवडणुकीनें महापालिकेंत नव्या युगाला सुरुवात झाली. अध्यक्षपद स्वीकारतांना लोकहितरक्षक पटेलांनीं असें जाहीर केलें कीं, हें पद म्हणजे मानाचीं जागा नव्हे तर कर्तव्याची भूमि आहे. आपल्या अध्यक्षीय कारकिर्दीत

त्यांनीं कर्तव्याची भूमिका कशी व किती निकरानें पार पाडली तें पाहूं या.

पटेलांच्या अगोदरचे अध्यक्ष हे मोठ्या सभांनाच फक्त उपस्थित असावयाचे व त्या वेळींहि सरकारनियुक्त कमिशनच्या तंत्रानें व सल्ल्यानेंच वागावयाचे. पण पटेलांचा सर्वच प्रकार निराळा. निवडणुकीच्या नंतर पहिल्याच दिवशीं ते महापालिकेच्या कचेरींत गेले. तेथें कमिशनरांच्या कचेरींत जाऊन " माझी कचेरी कोठें आहे ? " असा प्रश्न त्यांनीं विचारला. कमिशनर म्हणाले, " अध्यक्षांची स्वतंत्र अशी कचेरी नाहीं." यावर पटेल म्हणाले, " मला स्वतंत्र कचेरी लगेच करून पाहिजे आहे. " मग कमिशनरांनीं एका मोठ्या दिवाणखान्यांत पडदा सोडून व खुर्च्या टेबल मांडून अध्यक्षीय कचेरी तयार करून दिली. या कचेरींत रोज अगदीं नियमानें, महापालिकेच्या नोकराप्रमाणें, पटेल ११ ते ६ काम करूं लागले. आतांपर्यंत आपणांवर कोणी वरिष्ठ आहे याची जाणीव कमिशनरला नव्हती ती पटेलांनीं करून दिली !

पटेलांना कामाचा विलक्षण उरक होता. महापालिकेचें जुनें, रूढिप्रधान व स्वाभिमानशून्यतेचें अराष्ट्रीय स्वरूप त्यांना बदलावयाचें होतें. त्यासाठीं त्यांनीं सर्व 'स्पेशल कमिट्यां'चें अध्यक्षपद स्वतःकडे घेतलें व कामाला मोठ्या तडफेनें नि वेगानें सुरुवात केली. निरनिराळ्या समित्यांच्या त्यांनीं एका वर्षांत हजाराच्या वर सभा घेतल्या. सर्व सभांना ते स्वतः उपस्थित राहात. दिवसा वेळ पुरला नाहीं तर रात्रींच्या वेळीं सभा घेत, पण या महिन्याचें

काम त्या महिन्याला बाकी ठवीत नसत ! काम वेळच्या वेळीं संपलेंच पाहिजे हा त्यांचा कटाक्ष होता.

महापालिकेचा कमिशनर या सदैव इंग्रजच असावयाचा. पटेलांनीं त्या जागीं हिंदी इसम यावा अशी योजना केली. त्याचप्रमाणें अध्यक्षांनीं निवृत्त झाल्यावर गव्हर्नरला मेजवानी देण्याचा जो जुना प्रघात होता तोहि पटेलांनीं मोडून टाकला व खर्चाची मोठीच बचत केली. आतां भारताला अतिशय चकित करणारे व साऱ्या देशाचें लक्ष वेधून घेणारे दोन प्रसंग नमूद करतों.

## महापालिकेतर्फे गव्हर्नरास पत्र

१९२३ च्या डिसेंबरमध्यें मुंबई महापालिकेनें त्या वेळचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांना मानपत्र देण्याचा ठराव चर्चेसाठीं घेतला असतां पटेलांनीं मोठ्या धैर्यानें त्या ठरावाला विरोध केला. पण बहुमताच्या जोरावर तो ठराव मंजूर झाला. पटेलांनीं या गोष्टीच्या निषेधार्थ नागरिकांची जंगी जाहीर सभा घेतली व तींत महापालिकेच्या निषेधाचा व ठरावाला अनुकूल मतें देणारांचे राजिनामे मागण्याचा असे दोन्ही ठराव संमत करून घेतले. पटेलांचें सदैव असें म्हणणें असे कीं, व्यक्तीपेक्षां संस्था श्रेष्ठ व संस्थेपेक्षां जनता श्रेष्ठ. आणि म्हणूनच त्यांनीं या ठरावाबाबत जनमत व्यक्त होईल अशी योजना केली.

## व्हॉइसरॉयची मुंबईस भेट

पण याहिपेक्षां पुढील प्रसंग अधिक धीरोदात्त व पटेलांच्या खऱ्या कसोटीचा ठरला. तो प्रसंग असा. २ डिसेंबर

१९२४ ला व्हॉइसराय लॉर्ड रीडींग पत्नीसह मुंबईस येणार होते. त्यांच्या स्टेशनवरील स्वागत समारंभाचें, थाटाच्या सरकारी मेजवानीचें व 'गेट वे ऑफ इंडिया'-च्या उद्‌घाटनाचें असें तिहेरी निमंत्रण अध्यक्ष पटेलांना होतें. पटेलांनीं निमंत्रणें नाकारलीं. त्यांनीं आपला निर्णय मुंबई सरकारला पत्रानें कळविला. आपल्या पत्रांत पटेल लिहितात, "एकाहि समारंभास मला उपस्थित राहतां येत नाहीं याबद्दल खेद वाटतो. देशांतील राजकीय स्थिति पाहिली असतां माझ्या हजारों देशबांधवांप्रमाणें मलाहि अशा समारंभास हजर न राहण्यांतच स्वाभिमान आहे असें वाटतें. उभयतां पाहुण्यांना आपण हेंहि स्पष्ट-पणें कळवा कीं, आपल्या समारंभांना उपस्थित न राह-ण्यांत मीं माझें अवश्य असें राष्ट्रीय कर्तव्यच बजावीत आहें. त्यांत पाहुण्यांच्या अपमानाचा मुळींच हेतु नाहीं."

पटेलांनीं वरील पत्र आधीं रवाना केलें व मग व्हाइस-रॉयांच्या आगमनाचा विचार करण्यासाठीं महापालिकेची सभा घेतली! सभेच्या प्रारंभींच त्यांनीं सरकारला पाठ-विलेल्या पत्राची घोषणा केली. त्यासरशीं सभेंत भयंकर खळबळ माजली! बड्या लाटांच्या स्वागतसमारंभावर बहिष्कार! केवढें भयंकर पाप! महापालिकेचा किती घोर अपमान! राजनिष्ठ सभासद तर घाबरूनच गेले! त्यांनीं मोठ्या खटपटीनें अध्यक्ष पटेलांनीं उपस्थित राहा-वेंच असा जणूं आदेश देणारा ठराव पन्नास विरुद्ध चव्वेचाळीस मतांनीं मंजूर करून घेतला. आणि तरीहि पटेल समारंभांना अनुपस्थितच राहिले! कारण

संस्थेपेक्षां जनता श्रेष्ठ ना? म्हणूनच पटेलांनीं असें निर्भय वर्तन केलें.

## पटेलांचा अध्यक्षपदाचा राजिनामा

व्हाइसरॉय आले नि गेले. पण सरकारनिष्ठांचा आत्मा कांहीं शांत झाला नव्हता! महापालिकेच्या पुढच्या सभेंत त्यांनीं पटेलांच्या विरुद्ध निदाव्यंजक ठराव आणावयाचें ठरविलेंहि! पण पटेलांनीं त्यापूर्वींच आपल्या अध्यक्षपदाचा राजिनामा महापालिकेच्या सेक्रेटरीकडे पाठवून दिला होता! राजिनाम्याच्या पत्रांत ते म्हणतात, "बहुसंख्य सभासदांनीं संमत केलेला ठराव मी अमलांत आणूं शकलों नाहीं म्हणून मीं अध्यक्षपदावर राहणें योग्य नाहीं. ठराव इष्ट कीं अनिष्ट हा मुद्दा नाहीं. फक्त आहे या परिस्थितींत लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें कारभार चालला आहे कीं नाहीं तेवढें पाहावयाचें आहे व तसा तो चालूं द्यावा अशी माझी इच्छा आहे व म्हणून त्या तत्त्वास अनुसरून मीं राजिनामा दिला आहे."

पटेलांनीं व्हाइसरॉयांच्या स्वागतावर बहिष्कार घातला व त्यासाठीं एवढें महत्त्वाचें नि मानाचें अध्यक्षपद झिडकारलें, पण माघार घेतली नाहीं, ही बातमी सर्व देशभर पसरली. या स्वाभिमानी व बाणेदार वृत्तीबद्दल पटेलांचें जागजागीं सार्वजनिक अभिनंदन झालें.

## पुनः तेच अध्यक्ष

पटेलांच्यानंतर महापालिकेचे अध्यक्ष कोण होणार याकडे सर्व देशाचें लक्ष लागून राहिलें. अध्यक्षांची पुनः

निवडणूक होण्यापूर्वी झालेल्या चारपांच सभांचें तात्पुरतें अध्यक्षपद बहुमतानें पटेलांनाच देण्यांत आलें आणि दि. ५ जानेवारी १९२५ ला मोठी चुरशीची निवडणूक होऊन पटेल हे ५० विरुद्ध ४५ मतांनीं विजयी झाले. पुनः नव्यानें अध्यक्षपदीं विराजमान झाल्यावर पटेल म्हणाले, "ज्या कारणाकरितां मीं राजिनामा दिला तें कारण अयोग्य नव्हतें ही गोष्ट तुम्ही चांगली सिद्ध केलीत. मला पुनः निवडण्यांत तुम्ही माझा गौरव केला नसून जनतेचा गौरव केला आहे. तिच्याच इच्छेला आपण मान दिला आहे व त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें." पटेलांची मुदत संपल्यावर त्याच्या चाहत्यांनीं त्यांच्या गौरवार्थ थाटाची मेजवानी दिली व त्यांना सहा हजारांची थैली अर्पण केली. पटेलांनीं ती सर्व रक्कम देशकार्याला देऊन टाकली ! पटेलांच्या थोर नि त्यागी वृत्तीची आणखी एक गोष्ट नमूद करतों. अध्यक्षाचे साधे सभासद झाल्याबरोबर पटेलांनीं महापालिकेंत असा ठराव मंजूर करून घेतला कीं, अध्यक्षांना सुसज्ज अशी स्वतंत्र कचेरी, नोकरचाकर व स्वतंत्र मोटार असावी. आपण अध्यक्ष असतांना पटेलांनीं स्वतः बडेजावी मिरविली नाहीं पण भावी अध्यक्षांचा मात्र याप्रमाणें बडेजाव राखला !

## आतां दिल्लीचें रणक्षेत्र

१४ नोव्हेंबर १९२३ रोजीं पटेल मुंबई शहरातर्फे मध्यवर्ती विधिमंडळांत (लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत) स्वराज्यपक्षाचे सर्वश्रेष्ठ उमेदवार म्हणून पहिल्या

क्रमांकानें निवडून आले. आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत त्यांनी मतदारांना असें आश्वासन दिलें होतें कीं, "तुम्ही मला निवडून आणलेंत तर मी राष्ट्रीय सभेच्या मागण्या विधिमंडळांत आग्रहानें मांडीन व त्या मान्य झाल्या नाहींत तर नोकरशाहीला हरएक शुद्ध उपायांनीं पदोपदीं हैराण करीन. त्यांना स्वस्थ बसूं देणार नाहीं."

विधिमंडळांत स्वराज्य पक्षाचा ४५ सभासदांचा एक शिस्तीचा व मोठा प्रभावी असा गट निवडून आला होता. पंडित मोतीलालजी नेहरू हे त्या गटाचे अध्यक्ष, पटेल उपाध्यक्ष व तात्यासाहेब केळकर हे 'व्हिप' म्हणजे संचालक म्हणून निवडले गेले. नेहरू-पटेलांचा दरारा विलक्षण होता. त्यांची जोडी पाहतांक्षणींच नोकरशाहीला भावी प्रखर झुंजीची कल्पना आली.

पटेलांच्या कार्यदक्षतेबरोबर त्यांची स्पष्टवक्तेपणाबद्दलहि ख्याति होती. युरोपियन लोकांशीं ते फटकून वागत. त्यांच्या बोलण्यांत तिखटपणा असावयाचा. त्यांचीं भाषणें भारीं प्रखर होत. कायदेमंडळाच्या कामांत पटेल फार पटाईत, हजरजबाबी, करारी, खंबीर व धीट होते. आणि म्हणूनच पंडित मोतीलालजींनीं त्यांची या थोर विधिमंडळाच्या अध्यक्षपदासाठीं उमेदवार म्हणून निवड केली.

## अखिल भारतीय विधिमंडळाचे जगद्विख्यात अध्यक्ष

२२ ऑगस्ट १९२५ रोजीं अध्यक्षांची निवडणूक झाली. नेहरू-केळकर यांच्या चातुर्यामुळें पटेल हे ५८ विरुद्ध ५६ मतांनीं मोठ्या अटीतटीनें पहिले लोकनियुक्त अध्यक्ष

म्हणून निवडून आले. मुंबईस व्हाइसरॉयचें स्वागत न करतां राजिनामा दिला याचा सूड नोकरशाहीला घ्यावयाचा होता म्हणून त्यांनीं पटेलांना पराभूत करण्याचा खूप प्रयत्न केला पण शेवटीं त्यांचीच फजिती झाली ! मुंबई महापालिकेचें अध्यक्षपद सजविणारे व गाजविणारे पटेलच येथेंहि दंड थोपटून भावी लढ्याला सिद्ध झाले ! या थोर बहुमानाबद्दल देशांतील सर्व राजकीय पक्षांनीं अध्यक्ष पटेलांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

## स्वदेशी व्रताचें कटाक्षानें पालन

अध्यक्षांनीं विधिमंडळाचें काम चालवितांना विलायती काळा झगा व डोक्यावर टोप घालावयाचा अशी पद्धत होती. पटेल तर स्वदेशीचे व्रतधारी. तेव्हां अध्यक्षपदावर विराजमान होतांना पटेल कोणता पोशाख करणार याकडे सगळ्यांचें लक्ष लागलें. जो तो त्यांच्या आगमनाकडे अगदीं उत्सुकतेनें बघूं लागला ! पटेलांनीं झग्यासाठीं स्वदेशी खादी मिळविण्याचा खूप प्रयत्न केला पण सिमल्याला ऐन वेळीं झग्यासाठीं लागणारी काळी रेशमी खादी कांहीं मिळेना. आणि विलायती झगा तर अंगावर घालावयाचा नाहीं हा तर पटेलांचा बाणा. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं विठ्ठलभाईंना एक मोठी नामी युक्ति सुचली. त्यांनीं श्रीमती सरोजिनीबाई नायडूंची एक काळी रेशमी खादीची साडी मागवली आणि ती फाडून तिचा झगा करून तो अंगावर घातला नि मग हे भारताच्या लोकसभेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष खुर्चीवर येऊन बसले !

पटेलांनीं संपूर्णपणें राष्ट्रकार्य साधण्यासाठींच अध्यक्ष-पद स्वीकारलें होतें. सरकारच्या बालेकिल्ल्यांत राष्ट्रीय तेज त्यांनींच प्रथम निर्माण केलें. तें करतांना त्यांना जसें झगडावें लागलें तसेंच त्यागाचें व्रतहि स्वीकारावें लागलें. त्यांची राहाणी अगदीं साधी असे. ते अध्यक्षाच्या खुर्चीवर धोतर नेसून बसत. कधीं टोपाऐवजीं गांधी टोपी घालीत. घरीं जमिनीवर पाट मांडून जेवावयास बसत. कडक शाकाहार पाळीत. या विविध कारणांमुळें इंग्रज अधिकारी पटेलांना जवळ करीत नसत ! पण यावर पटेलांचें म्हणणें असें कीं, मी कांहीं विलायत सरकारचा दूत नाहीं. मी अध्यक्ष आहें. म्हणजे मी एक हिंदी जनतेचा प्रतिनिधि—सेवक आहें. हिंदी लोकांच्या चालीरीती त्यांच्या प्रतिनिधीनें पाळल्याच पाहिजेत.

### निम्मा पगार राष्ट्रकार्यासाठीं

१० मे १९२६ रोजीं म. गांधींना पत्र पाठवून पटेलांनीं असें कळविलें कीं माझ्या पगाराचा निम्मा वांटा म्हणजे रु. १६२५ मी दरमहा आपल्याकडे पाठवीन. त्याचा विनियोग तुमच्या पसंतीप्रमाणें करावा. म. गांधींनीं या राष्ट्रकार्याला दिलेल्या उदार देणगीबद्दल पटेलांचे आभार मानले व इतरांनीं या उदाहरणाचें अनुकरण करावें अशी आशा व्यक्त केली.

### पुनः पटेलच अध्यक्ष

पहिली अध्यक्षीय कारकीर्द एका वर्षाचीच होती. त्यानंतर विधिमंडळाची निवडणूक होऊन १९२७ च्या आरंभाला पटेल पुनः अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून

आले. ब्रिटिश पार्लमेंटच्या ( लोकसभेच्या ) कामकाजाची माहिती मिळवावी या हेतूनें पटेल १९२७ च्या एप्रिल-मध्यें विलायतेस गेले. तेथें त्यांचे पार्लमेंटतर्फें व विविध संस्थांतर्फें सत्कार झाले. २५ मे १९२७ रोजीं बादशहा पांचवे जार्ज यांनींहि अध्यक्ष पटेलांचें स्वागत करून त्यांना मुलाखत दिली. त्या प्रसंगीं पटेलांनीं राजेसाहेबांना स्पष्ट बजावलें कीं, "तुम्ही हिंदुस्थानला ताबडतोब पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य दिल्याशिवाय परिस्थिति निवळणार नाहीं व हिंदुस्थान व ब्रिटन यांचा सलोखा राहणार नाहीं."

### सायमन कमिशनचा बोचक अपमान

इंग्रज सरकारनें हिंदुस्थान स्वराज्याला कितपत लायक आहे हें पाहण्यासाठीं सायमन कमिशन नेमलें. कॉंग्रेसनें व इतर सर्व पक्षांनीं या कमिशनवर सार्वत्रिक बहिष्कार घातला. अनेक लोक म्हणूं लागले कीं, पटेलांनींहि राजिनामा देऊन बहिष्कार पुकारावा ! पण पटेल कसे धीरानें व राष्ट्राभिमानानें वागले हें पाहा. त्यांनीं अध्यक्षपद तर सोडलें नाहींच पण त्या पदावरून त्यांनीं कमिशनला राष्ट्रीय बहिष्काराची मोठी बोचक जाणीव करून दिली ! त्यांनीं कमिशनला विधिमंडळाला भेट देण्यास बोलाविलें. पण त्या वेळीं बरेच सभासद परगांवीं गेल्यामुळें उजाड झालेल्या विधिमंडळाच्या साध्या प्रेक्षकांच्या गॅलरींत त्यांना बसवून व स्वागताचा कांहीं एक थाटमाट न करून त्यांनीं राष्ट्रीय अपमानाचें चांगलेंच उट्टें काढलें ! राजिनामा न देणाऱ्या पटेलांच्या या चातुर्यानें सर्व पक्ष थक्क होऊन गेले !

## ब्रिटिश सिंहाच्या गुहेंत शिरून त्याच्याशीं झुंज

सायमन कमिशनच्या अपमानाच्या प्रसंगापेक्षां भयंकर अपमानाचा प्रसंग लवकरच सरकारवर ओढवला. एका ठरावावरील चर्चेच्या प्रसंगीं सरसेनापति बर्डवुड यांनीं विधिमंडळांत उपस्थित राहणें कायद्याच्या दृष्टीनें आवश्यक होतें. पण ते उपस्थित न राहतां दौऱ्यावर निघून गेले! त्यांना वाटलें, 'मी व्हाइसरॉयच्या बरोबरीचा दर्जा असलेला अधिकारी. मला कोण हटकणार?' पण येथें पटेलांशीं गांठ आहे हें ते विसरले. पटेलांनीं सरसेनापतींच्या कृत्यावर खरपूस टीका केली व व्हाइसरॉयना कळविलें कीं, "सरसेनापतींनीं चर्चेला गैरहजर राहून मुद्दाम असभ्यपणाचें वर्तन केलें आहे. त्यांनीं असेंब्लीचा (विधिमंडळाचा) व अध्यक्षांचा जाणून बुजून अपमान केला आहे." यावर व्हाइसरॉयनें पटेलांना लिहिलें कीं, "जाणून बुजून, मुद्दाम" हे शब्द माघारी घ्या. पण त्या गोष्टीला पटेलांनीं साफ नकार तर दिलाच पण आपला मुद्दा जोरकस मांडून सरसेनापतींनीं गैरहजेरीबद्दल दिलगिरी व्यक्त करावी असें सांगितलें. 'कांहीं झालें तरी मला माझें कर्तव्य केलेंच पाहिजे' असें पटेलांनीं बजावल्यावर शेवटीं सरसेनापतींनीं पटेलांची माफी मागितली व मग हें प्रकरण मिटलें!

## पब्लिक सेफ्टी बिल व पटेल

१९२८ च्या सप्टेंबरमध्यें सरकारनें पब्लिक सेफ्टी नांवाचें एक बिल विधिमंडळांत संमतीसाठीं मांडलें. या कायद्यानें गव्हर्नर जनरलला कम्युनिस्ट पंथाचा प्रसार

करणाऱ्याला व राज्यतंत्र मोडून टाकणाऱ्याला चौकशी-वांचून हिंदुस्थानांतून हद्दपार करण्याचा अधिकार मिळणार होता. अर्थात्च लोकपक्षानें या कायद्याला विरोध केला. मतें घेतलीं तेव्हां सरकारपक्षाला ६१ व लोकपक्षाला ६१ अशीं मतें पडलीं. तेव्हां देशभक्त पटेलांनीं आपलें मत लोकपक्षाच्या बाजूनें टाकून त्या पक्षाला विजय मिळवून दिला! पण यामुळें सरकारपक्षीय वृत्तपत्रें खूप चिडलीं व त्यांनीं पटेलांची निंदानालस्ती सुरू केली. पटेलांनीं त्यांचीं प्रवेशपत्रें रद्द केलीं व संपूर्ण माफी मागितल्या-शिवाय सभागृहांत पुनः प्रवेश मिळणार नाहीं असें बजावलें. नंतर वरील वृत्तपत्रांनीं सपशेल माफी मागितली. त्यांत मुंबईचा 'टाइम्स' हा प्रमुख होता!

### विधिमंडळांत दत्त-भगतसिंगांची बॉंबफेक

सरकारहि लोकमताची पर्वा न करतां हट्टाला पेटलें व त्यांनीं कांहीं मुदतीनंतर पुनः तो कायदा विधिमंडळापुढें मांडला! या वेळेस या कायद्याच्या दृष्टीनें संबंधित असणारा सुप्रसिद्ध मीरत खटला चालू होता. पटेलांनीं नेमकें या मुद्द्यावरच सरकारला अडविलें व बजावलें कीं, एक हा कायदा तरी मागें घ्या नाहीं तर खटला तरी काढून घ्या. सरकार कांहीं नमेना तेव्हां पटेल आपला अखेरचा निर्णय देण्यासाठीं उभे राहिले. पण-पण ते उभे राहतात न राहतात तोंच लोकक्षोभाची एक जग हादरविणारी घटना सभागृहांत घडली. दत्त-भगतसिंग या शूर क्रांतिकारकांनीं सरकारपक्षाच्या बाजूला एकामागून एक असे दोन बॉंब

झोकले ! सर्वत्र गोंधळ, गडबड व धांवपळ ! एक पुरुष उंचीची ज्वाला व सर्वत्र कोंदलेला धूर पाहून तेथें सायमन-सहित असलेल्या पांचशें प्रेक्षकांची काय त्रेधा उडाली ! पटेल शांतपणें व चकित होऊन सर्व पाहात आपल्या जागींच उभे होते. दत्त-भगतसिंग आपणहून पोलिसांच्या स्वाधीन झाले ! दुसऱ्या दिवशीं पटेलांनीं आपला पुढीलप्रमाणें निर्णय दिला. "या कायद्याची चर्चा नियमबाह्य होणार म्हणून हा कायदा मी काढून टाकतों. मी अध्यक्षांच्या हातचा अधिकार सरकारला घेऊं देणार नाहीं!" पण एवढें होऊनहि शेवटीं सरकारनें वटहुकूम काढून तो कायदा देशावर लादला! वटहुकूम काढण्यापूर्वीं व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं विधिमंडळापुढें भाषण करून अध्यक्षांच्या निर्णयावर टीका केली. त्यासरशीं पटेलांनीं त्यांनाहि धारेवर धरून जाहीरपणें खेद व्यक्त करावयास लावलें !

## दिल्ली-सिमल्यास पटेल-राज्य

पटेलांचें हें तेजस्वी, कणखर व राष्ट्राभिमानानें तळपणारें अध्यक्षीय वैभव पाहून त्यांच्या देशबांधवांचीं मनें प्रसन्न झालीं व पटेलांसंबंधींच्या आदरानें ओतप्रोत भरून गेलीं. पण सरकारपक्षीय मात्र जळफळत होते. 'दिल्ली-सिमल्यास आतां पटेल-राज्य चालू आहे' असाहि ओरडा युरोपियन लोकांनीं सुरू केला !

## 'पाटील' चावडींतून बाहेर पडले

विधिमंडळाचें प्रातिनिधिक स्वरूप नष्ट झाल्यामुळें व देशांत सुरू झालेल्या स्वातंत्र्यलढ्यांत प्रत्यक्ष भाग

घ्यावयाचा असल्यामुळें पटेलांनीं १९३० च्या एप्रिलमध्यें आपलें कांटेरी आसन सोडलें. राजिनामा देऊन आपले हे खंबीर 'पाटील' भारताच्या चावडींतून बाहेर पडले. पण बाहेर पडण्यापूर्वी म्हणजे अध्यक्षपद सोडण्यापूर्वी त्यांनीं अध्यक्षाच्या जागेचा मान, अधिकार व दरारा वाढवून आपल्या लोकांचा विश्वास व निस्सीम प्रेम संपादन केलें होतें. निर्भयता, निःस्पृहता व जाज्वल्य देशाभिमान या गुणांची स्वतःच्या उदाहरणानें देशबांधवांना शिकवण देऊन अध्यक्ष पटेलांनीं आपलें व आपल्या देशाचें नांव पंचखंडांत गाजविलें – अमर केलें !

**स्वातंत्र्यलढ्यांत उडी, सक्तमजुरी, परदेशगमन व मृत्यु**

आपल्या देशबांधवांच्या खांद्याला खांदा लावून पटेलांनीं स्वातंत्र्यलढ्यांत उडी घेतली. त्यांत त्यांना अटक होऊन सक्तमजुरीची शिक्षा झाली ! तुरुंगांत असतांना त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें त्यांना परदेशीं म्हणजे व्हिएन्नाला पाठविण्यांत आलें. तेथें त्यांची प्रकृति दिवसेंदिवस अधिकच खालावत गेली. नेताजी सुभाष बोस हे स्वतः पटेलांची तेथें शुश्रूषा करीत होते. पण शेवटीं या महापुरुषाचा जिनिव्हा येथें २२ ऑक्टोबर १९३३ रोजीं अंत झाला ! अशा पुण्यात्म्यांच्या पुण्याईनें व कृतींनींच भारत स्वतंत्र झाला. म्हणूनच त्यांना आपण शतशः वंदन करूं या !

* * *

९२३८ दि.
बा.वा.
BVBK-0401237

# काहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्धयर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरिभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फाय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई दी बीज उठाय : बुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : संताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब डोंबिकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.